## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०१४

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आयसीई. ०६१०/प्र.क्र.८१/कामगार-६.— भारताच्या संविधानाचे अनुच्छेद २३३, २३४ व २३५ तसेच अनुच्छेद ३०९ चे परंतुक यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, विनियम, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, मुंबई उच्च न्यायालय व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर औद्योगिक न्यायालयाचे अध्यक्ष, औद्योगिक न्यायालयाचे सदस्य व कामगार न्यायालयाचे न्यायाधीश या पदांच्या सेवाप्रवेशाचे, नियुक्तीचे व शिस्तभंगाच्या कारवाईचे विनियम करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र कामगार न्यायालये व औद्योगिक न्यायालये यांचे न्यायिक अधिकारी (सेवाप्रवेश, नियुक्ती आणि शिस्तभंगाची कारवाई) नियम, २०१४, असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ (१९४७ चा ११), असा आहे;

(ब) " जिल्हा न्यायाधीश " या संज्ञेला भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २३६ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणेच अर्थ असेल;

(क) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ड) " उच्च न्यायालय " याचा अर्थ, मुंबई येथील उच्च न्यायालय, असा आहे;

(ई)) " औद्योगिक न्यायालय " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १० अन्वये घटित केलेले औद्योगिक न्यायालय, असा आहे;

(फ) " न्यायाधीश " याचा अर्थ, कामगार न्यायालयाचा न्यायाधीश, असा आहे;

(ग) " कामगार न्यायालय " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ अन्वये घटित केलेले कामगार न्यायालय, असा आहे;

(ह) " सदस्य " याचा अर्थ, औद्योगिक न्यायालयाचा सदस्य, असा आहे;

(आय) " अध्यक्ष " याचा अर्थ, औद्योगिक न्यायालयाचा अध्यक्ष, असा आहे ;

(जे) " निवड समिती " याचा अर्थ, या नियमांच्या नियम ३ अनुसार घटित केलेली निवड समिती, असा आहे.

३. निवड समिती ही, उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात येईल त्याप्रमाणे, उच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांची मिळून बनलेली असेल, त्यांच्यापैकी सर्वात ज्येष्ठतम हा अध्यक्षपदी असेल.

४. अध्यक्ष या पदावरील नियुक्ती, राज्यपालांकडून, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून उच्च न्यायालयाद्वारे निश्चित करण्यात येईल अशा पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करता येईल :—

(१) पदोन्नती,

(२) नामनिर्देशन, किंवा

(३) बदली.

**नियुक्तीची पद्धत.—** (अ) ज्याने औद्योगिक न्यायालयाचा सदस्य म्हणून किमान दहा वर्षे काम केले आहे आणि जिला निवड श्रेणी देण्यात आली आहे अशा योग्य व्यक्तीची, उच्च न्यायालयाच्या शिफारशीवरून, पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल;

(ब) (एक) जी, उच्च न्यायालयाची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली जाण्यास अर्हताप्राप्त आहे ; किंवा

(दोन) जी किमान दहा वर्षे जिल्हा न्यायाधीश म्हणून काम केले किंवा करीत आहे आणि जिला निवड श्रेणी देण्यात आली आहे - अशा व्यक्तीची, निवड समितीच्या शिफारशीवरून, नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात येईल ;

(क) वरील खंड (ब) च्या उप-खंड (दोन) मध्ये नमूद केलेल्या आवश्यकतांची पूर्तता करीत आहे अशा योग्य जिल्हा न्यायाधीशाची बदली करून नियुक्ती करण्यात येईल.

५. सदस्य या पदावरील नियुक्ती, राज्यपालांकडून, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, उच्च न्यायालयाद्वारे निश्चित करण्यात येईल अशा पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(१) पदोन्नती,

(२) नामनिर्देशन, किंवा

(३) बदली :

परंतु, शक्यतोवर, पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे ५० : ५० या प्रमाणात नियुक्त्या करण्यात येतील.

**नियुक्तीची पद्धत.—** (अ) ज्याने कामगार न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून किमान पाच वर्षे काम केले आहे अशा योग्य न्यायाधीशाची, उच्च न्यायालयाच्या शिफारशीवरून, पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल ;

(ब) (एक) जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास जिचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी नाही आणि ४५ वर्षांपेक्षा अधिक नाही :

परंतु, सेवाप्रवेशाच्या प्रयोजनार्थ, शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या जाती/जमातीतील उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५० वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने उच्च न्यायालय किंवा त्याला दुय्यम असलेल्या न्यायालयांमध्ये किमान दहा वर्षे अधिवक्ता म्हणून व्यवसाय केलेला आहे ;

अशा व्यक्तीची, निवड समितीच्या शिफारशीवरून, नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल ;

(क) योग्य जिल्हा न्यायाधीशाच्या बदलीने नियुक्ती करण्यात येईल.

६. कामगार न्यायालयाचा न्यायाधीश या पदावरील नियुक्ती, उच्च न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—

(१) नामनिर्देशन, किंवा

(२) बदली.

**नियुक्तीची पद्धत.—** (अ) (एक) ज्याने उच्च न्यायालयात किंवा त्याला दुय्यम असलेल्या न्यायालयांमध्ये, किमान ७ वर्षे अधिवक्ता म्हणून व्यवसाय केलेला आहे ;

(दोन) जाहिरात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकास ज्याचे वय ३० वर्षांपेक्षा कमी नाही व ४० वर्षांपेक्षा अधिक नाही :

परंतु , सेवाप्रवेशाच्या प्रयोजनार्थ, शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या जाती/जमातीतील उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

अशा व्यक्तीची, निवड समितीच्या शिफारशीवरून, राज्यपालांकडून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात येईल ;

(ब) उच्च न्यायालयाकडून योग्य अशा दिवाणी न्यायाधीशाच्या, वरिष्ठ स्तर आणि न्याय दंडाधिकाऱ्यांच्या - प्रथम वर्ग बदलीने, नियुक्ती करण्यात येईल :

परंतु , शक्य असेल तेथवर, नामनिर्देशनाद्वारे व बदलीने ७०:३० या प्रमाणात नियुक्त्या करण्यात येतील.

७. (अ) नियम ४, ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीला मराठी भाषा बोलण्याचे, वाचण्याचे, लिहिण्याचे आणि मराठीतील लेखी माहितीचा इंग्रजीत व इंग्रजीचा मराठीत अनुवाद करण्याचे पुरेसे ज्ञान असेल.

(ब) नियम ४, ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी परीक्षा, जर ती या अगोदर उत्तीर्ण झाली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून तिला सूट मिळाली नसेल तर त्या परीक्षा तिने उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

८. नियम ४, ५ व ६ यांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, वयाच्या ५८ व्या वर्षानंतर सेवा पुढे चालू राहण्यासाठी, मुख्य न्यायमूर्तींनी घटित केलेल्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या समितीने केलेल्या निर्धारणाच्या व मूल्यमापनाच्या अधीन राहून, वयाची ६२ वर्षे पूर्ण झाल्यावर सेवानिवृत्त होईल. असे निर्धारण व मूल्यमापन हे, संबंधित सेवा नियमान्वये यापूर्वीच्या टप्प्यामध्ये / टप्प्यांमध्ये, करण्यात येईल अशा सक्तीच्या सेवानिवृत्तिसाठी असलेल्या निर्धारणाव्यतिरिक्त किंवा इतर निर्धारण व मूल्यमापन याव्यतिरिक्त असेल.

९. नियम ५ व ६ यांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, उच्च न्यायालयाकडून, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

१०. नियम ४, ५ व ६ यांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर असेल आणि तिला उच्च न्यायालयाच्या शिफारशीशिवाय व त्याखेरीज कायम करता येणार नाही :

परंतु परिवीक्षेच्या कालावधीमध्ये उच्च न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे, वेळोवेळी वाढ करता येईल.

परिवीक्षा कालावधीदरम्यान लेखी आदेशाद्वारे स्पष्टपणे कायम करण्यात येईपर्यंत, नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या सेवा एकतर तिला एक महिन्याची नोटीस देऊन त्यासाठीचे कोणतेही कारण नेमून न देता किंवा नोटीशीऐवजी वेतन देऊन उच्च न्यायालयाकडून समाप्त करण्यात येतील.

परिवीक्षा कालावधीदरम्यान, नियुक्त केलेल्या व्यक्तीला तिच्या सेवेतून, एक महिन्याची नोटीस देऊन किंवा नोटीशीऐवजी वेतन देऊन, काढून टाकता येईल.

११. (एक) अध्यक्ष किंवा, यथास्थिति, सदस्य या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीला, ज्या दिनांकास ती सेवेत असण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी, सेवेत असताना तिने ज्या न्यायालयात अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून अध्यक्षपद भूषविलेले असेल अशा कोणत्याही न्यायालयात किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयात व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येईल ; किंवा

(दोन) कामगार न्यायालयाचा न्यायाधीश या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीला, ज्या दिनांकास ती सेवेत असण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी, तिने सेवेत असताना ज्या न्यायालयात पीठासीन अधिकारी म्हणून काम केलेले होते अशा कोणत्याही न्यायालयात व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येईल.

१२. नियम ४, ५ व ६ यांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीचे, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या तरतुदींन्वये नियमन करण्यात येईल. तथापि, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २३५ च्या आधारे, उच्च न्यायालय हे, या प्रयोजनासाठी एक प्राधिकरण असेल आणि अध्यक्ष, सदस्य व न्यायाधीश यांच्यावर उच्च न्यायालयाचे शिस्त विषयक व इतर नियंत्रण असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरविंद कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 30th July 2014.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. ICE. 0610/C.R. 81/Labour-6.— In exercise of the powers conferred by Article 233, 234 and 235 read with the proviso to article 309 of the Constitution of India and of all other powers enabling inthis behalf, and in supersession of all existing rules, regulations, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra after consultation with the High Court of Judicature at Bombay and the Maharashtra Public Service Commission, is hereby pleased to make the following rules for regulating the recruitment, appointment and disciplinary actions to the post of the President of Industrial Court, Member of Industrial Court and Judge of Labour Court, namely :—

1. These Rules may be called the Maharashtra Judicial Officers of the Labour Courts and Industrial Courts (Recruitment, Appointment and Disciplinary Action) Rules, 2014.

2. In these Rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " Act " means the Maharashtra Industrial Relations Act, (XI of 1947);

(*b*) " District Judge " shall have the same meaning as defined in Article 236 of the Constitution of India;

(*c*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*d*) " High Court " means the High Court of Judicature at Bombay ;

(*e*) " Industrial Court " means the Industrial Court constituted under section 10 of the Act ;

(*f*) " Judge " means a Judge of the Labour Court ;

(*g*) " Labour Court " means the Labour Court constituted under Section 9 of the Act ;

(*h*) " Member " means a Member of the Industrial Court ;

(*i*) " President " means the President of the Industrial Court ; and

(*j*) " Selection Committee " means the Selection Committee constituted in accordance with Rule 3 of these Rules.

3. The Selection Committee shall consist of three Hon'ble Judges of the High Court, as may be nominated by the High Court, from time to time, senior-most out of them being the Chairman.

4. Appointment to the post of the President shall be made by the Governor in consultation with the High Court, by any one of the following modes, as may be determined by the High Court, namely :—

(1) Promotion,

(2) Nomination, or

(3) Transfer.

*Mode of Appointment.*— (*a*) by promotion, on the recommendation of the High Court of a suitable person, who has worked for not less than ten years as a Member of the Industrial Court and has been conferred Selection Grade ;

(*b*) by nomination, on recommendation of the Selection Committee, of a person who,—

(*i*) is qualified for being appointed as a Judge of the High Court ; or

(*ii*) is or has been District Judge for not less than ten years and has been conferred selection Grade ;

(*c*) by transfer of a suitable District Judge who fulfills the requirements mentioned in sub-clause (*ii*) of the Clause (*b*) above.

5. Appointment to the post of Member shall be made by the Governor in consultation with the High Court, by any one of the following modes, as may be determined by the High Court, namely :—

(1) Promotion,

(2) Nomination, or

(3) Transfer :

Provided that, the appointments by promotion and by nomination shall, as far as possible, be made in the ratio of 50 : 50.

*Mode of Appointment*.— (*a*) by promotion, on the recommendation of the High Court, of a suitable Judge, Labour Court who has worked for not less than five years ;

(*b*) by nomination, on recommendation of the Selection Committee, of a person who,—

(*i*) is not less than 35 years and is not more than 45 years of age on the date of the Publication of the advertisement :

Provided that, the upper age limit may be relaxed upto 50 years in favour of the candidates belonging to communities recognized as backward by the Government, for the purpose of recruitment.

(*ii*) has practiced as an advocate in the High Court or any courts subordinate to it, for not less than ten years ;

(*c*) by transfer of a suitable District Judge.

6. Appointment to the post of Judge, Labour Court, shall be made by any one of the following modes, as may be determined by the High Court, namely :—

(1) Nomination, or

(2) Transfer.

*Mode of Appointment.*— (*a*) by nomination, on recommendation of the Selection Committee, by the Governor of a person :

(*i*) who has practiced as an Advocate in the High Court or in the Courts subordinate to it for not less than 7 years ;

(*ii*) who is not less than 30 years and not more than 40 years of age on the date of publication of the advertisement :

Provided that the upper age limit may be relaxed upto 43 years in favour of the candidates belonging to communities recognized as backward by the Government for the purpose of recruitment ;

(*b*) by transfer of a suitable Civil Judge, Senior Division and Judicial Magistrate First Class by the High Court :

Provided that, the appointments by nomination and by transfer shall be made, as far as possible, in the ratio of 70 : 30.

7. (*a*) A person to be appointed to any of the posts mentioned in rules 4, 5 and 6 shall have sufficient knowledge of Marathi enabling him to speak, read, write and translate with facility from the written character into English and *vice-versa*.

(*b*) A person appointed to any of the posts mentioned in rules 4, 5 and 6 shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in this behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

8. A person appointed to any of the posts mentioned in rules 4, 5 and 6 shall retire on completing the age of 62 years, subject to assessment and evaluations of potential for continued utility at the age of 58 years, by the Committee of Hon'ble Judges of the High Court constituted by the Honorable Chief Justice. Such assessment and evaluation shall be in addition to the assessment for compulsory retirement or other assessment and evaluation that may have been undertaken under the relevant service rules at an earlier stage/s.

9. A person appointed to any of the posts mentioned in rules 5 and 6 shall be liable to be transferred by the High Court anywhere in the State of Maharashtra.

10. A person appointed to any of the posts mentioned in rules 4, 5 and 6 by nomination, shall be on probation for a period of two years, and shall not be confirmed, save and except on the recommendation of the High Court :

Provided that, the period of probation may be extended by the High Court from time to time, as it may deem fit.

During the period of probation and until expressly confirmed by a written order, the services of an appointee shall be terminated by the High Court by one month's notice without any reason being assigned therefore or by payment of salary in lieu of notice. The appointee may also be terminated from his service during the probation period, by giving one month's notice or by payment of salary, in lieu of notice.

11. A person appointed to the post of,—

(*i*) a President or a Member, as the case may be, shall be debarred for a period of two years from the date on which he ceases to be in service, from practicing in any Court in which he has presided as a President or a Member while in service or in any Court subordinate thereto; or

(*ii*) the Judge of a Labour Court shall be debarred from practicing in any Court in which he was the Presiding Officer while in service, for a period of two years from the date on which he ceased to be in service.

12. A person appointed to any of the posts mentioned in rules 4, 5 and 6 shall be governed by the provisions of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979. However, by virtue of article 235 of the Constitution of India, the High Court shall be the authority for this purpose and shall have disciplinary and other control over the President, Member and Judge.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND KUMAR,
Principal Secretary to Government.